
TOP 10 SHARES
सकाळ
मे २०२५ । किंमत ५० रुपये
MONEY
रेपो दरात घट
कर्जदारांचा वट
लग्नानंतरचे
गुंतवणूकविश्व
माकडं,
मार्केट आणि
म्युच्युअल फंड
महागाई
आणि मंदी
डर के आगे
जीत है!
ट्रम्प धोरण
दोघांचे भांडण...
सुवर्णसंधी
तुमच्या
हाती!

# लग्नानंतरचे बदलणारे गुंतवणूकविश्व



सुहास राजदेरकर
suhas.rajderkar@gmail.com

भारतामध्ये घटस्फोट घेणाऱ्यांचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे दिसत आहे. मागील तीन वर्षांमध्ये ते मोठ्या प्रमाणावर म्हणजे जवळपास १७ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. या सर्वांचा त्यांच्या गुंतवणुकीवर होणारा परिणाम अतिशय मोठा आणि गंभीर आहे आणि त्यामुळेच या विषयावर मोकळेपणाने बोलण्याची आणि हा विषय समजून घेण्याची मोठी गरज आहे.



देशात घटस्फोटाचे वाढलेले प्रमाण गंभीर आहे. यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत आहेत, जसे की सतत वाढणारे शहरीकरण, विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी करणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण, त्यांचा गुंतवणुकीमधील सहभाग, दोघांची तडजोड न करण्याची वृत्ती तसेच मुलींच्या आई-वडिलांची घटस्फोट स्वीकारण्याची वाढलेली मानसिकता आदी. मागील पाच वर्षांपासून मध्यमवर्गीयांमध्येसुद्धा घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. परंतु, आपला आजचा विषय हा नाही. याचा गुंतवणुकीवर होणारा गंभीर परिणाम आणि त्याचे आर्थिक स्वास्थ्यावर होणारा परिणाम याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

**लग्नानंतर पती-पत्नीचे पटले नाही, तर प्रॉपर्टी आणि गुंतवणूकविषयक अनेक प्रश्न निर्माण होतात.**

१. मुलीच्या माहेरून आणलेले दागिने आणि इतर ऐवज
२. आई-वडिलांनी मुलीच्या नावावर केलेली संपत्ती
३. मुलीने लग्नानंतर स्वतः कमावलेले पैसे आणि इतर संपत्ती,
४ दोघांनी मिळून केलेली गुंतवणूक किंवा निर्माण केलेली संपत्ती.
५. घरखर्च कोणी करायचा, मुलांची फी कोणी भरायची
६. लग्नाआधीची मालमत्ता कोणाची
७. वारसाहक्कातील संपत्ती किंवा बिझनेस
८. हल्ली अनेक मुली एकुलत्या एक असतात त्यामुळे मुलीचे आई-वडील आजारी पडले, तर त्यांचा खर्च कोणी करायचा. मेडिकल इन्शुरन्समध्ये मुलीच्या आई-वडिलांचे नाव घालावे का?
९. ईएमआय, कर्ज, क्रेडिट कार्ड भरण्याची भूमिका
१०. विभक्त झाल्यास भत्त्याची अपेक्षा
११. मुलांची योजना आणि भावी मालमत्तेचे नियोजन

असे अनेक प्रश्न निर्माण होतात. बहुतेक वेळा ते समजुतीने सोडविले जातात परंतु, काही वेळा त्यामध्ये वाद होऊ शकतात.

## प्री-नप अर्थात प्री-नपशियल ॲग्रीमेंट

खरेतर पाश्चात्य देशात यासाठी प्री-नप अर्थात प्री-नपशियल ॲग्रीमेंटची सोय असते. थोडक्यात, लग्नाआधीचे करारपत्र. तिथे अशा लग्नाआधीच्या करारांना कायदेशीर (कोर्टाची) मान्यता असते. परंतु, भारतामध्ये अशा प्री-नप ॲग्रीमेंटला कायद्यानी मान्यता नाही. परंतु, अशा करारांचा फायदा असा होतो की आधी काय ठरले होते ते लिखित असल्याने गैरसमज आणि गोंधळ टाळता येतात. प्री-नप म्हणजे लग्नाआधी दोघांमध्ये होणारा एक लेखी करार, ज्यात कोणती मालमत्ता कोणाकडे असेल, कोणते खर्च कोण उचलेल, आणि घटस्फोट किंवा विभक्त झाल्यास सर्व संपत्तीची वाटणी कशी केली जाईल, याबद्दल स्पष्ट नियम असतो. परंतु, अजूनही अनेकांना हा विचार खटकतो, विशेषतः जुन्या पिढीला हे पटत नाही. शहरांमध्ये आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र जोडप्यांमध्ये याचा स्वीकार वाढतो आहे. आणि हो, पूर्व करार करणे म्हणजे तुम्ही घटस्फोटाची शक्यता गृहितच धरली आहे, असे नाही. हे फक्त स्पष्ट नियोजन दर्शवते. भारतात लग्नाला एक पवित्र संस्कार मानले जाते. परंपरा, विधी आणि आयुष्यभराच्या नात्याचे आश्वासन असा संस्कार आहे. त्यामुळे असे करार करून आधीच असा अविश्वास दाखविणे अनेकांना आवडत नाही; पण आता जसजशी सामाजिक आणि आर्थिक स्थिती बदलते आहे, तसतसा प्री-नपचा स्वीकार वाढतो आहे. नुकत्याच घेतलेल्या एका सर्वेक्षणानुसार ५८ टक्के भारतीयांनी अशा प्रकारचे लग्नाआधीचे करार करण्यास आवडेल, असे मत व्यक्त केले आहे.

## लग्नानंतरचे आर्थिक नियोजन

लग्न ठरले असेल किंवा नुकतेच झाले असेल, तर हे तुमच्यासाठीच आहे. दोघांनी एकत्र बसून शांतपणे आर्थिक नियोजन करणे हे पहिले आणि अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. हा पाया नीट रचला गेला तर पुढे निर्माण होणारी इमारत मजबूत बनेल. लग्न हे प्रेम, आनंद आणि... बिलं यांचं एक नवं पर्व सुरू करते. आर्थिक नियोजन करणे जरी फार रोमँटिक वाटत नसले, तरी ते एकत्रित आयुष्यात अत्यंत गरजेचं आहे. आज आमच्यासारख्या आर्थिक आणि गुंतवणूक सल्लागारांपुढे एक आव्हान असते ते म्हणजे, नवविवाहित पती-पत्नी आर्थिक नियोजनासाठी आमच्याकडे जेव्हा येतात तेव्हा थोडे गोंधळलेले दिसतात. पतीचे पैसे वेगळे, पत्नीचे नियोजन वेगळे करावे का? हा त्यांच्यापुढे प्रश्न असतो कारण पुढे आपले पटेल की नाही याची खात्री आज नसते. परंतु, दोघांचे एकत्र आर्थिक नियोजन केले, तर ते अधिक फायद्याचे आणि पक्के ठरते. 'माझे पैसे, तुझे पैसे, करण्यापेक्षा आपले पैसे' असा विचार केला, की बरेचसे प्रश्न निकालात निघू शकतात.

याला एक धम्म रूल असा आहे, की मुले होईपर्यंत, पतीच्या गुंतवणुकीमध्ये पतीचे नाव पहिले आणि पत्नीचे दुसरे आणि नॉमिनेशन मध्ये पतीच्या आई आणि वडिलांचे नाव घालावे; तसेच पत्नीने कमावलेल्या पैशांच्या गुंतवणुकीमध्ये पतीचे नाव दुसरे आणि नॉमिनेशनमध्ये पत्नीच्या आई आणि वडिलांचे नाव घालावे. मुले झाल्यावर मात्र, हे नॉमिनेशन बदलून दोन्ही गुंतवणुकीसाठी मुलांची नावे घालावीत.

## काही नियम

१. **पैशांबद्दल मोकळेपणानं बोला :** एकमेकांशी तुमचे उत्पन्न, खर्च, कर्ज किंवा इतर आर्थिक जबाबदाऱ्या आणि उद्दिष्टे याबाबत प्रामाणिकपणे बोला. लपवाछपवी करू नका. जेव्हा पती किंवा पत्नी आम्हाला सूचना देतात, की माझी गुंतवणूक माझ्या जोडीदाराला सांगू नका, तेव्हा आम्हाला खूप ते योग्य वाटत नसले, तरीही व्यावसायिक नियमांनुसार आम्हाला त्याची अंमलबजावणी करावीच लागते. सुरुवातीपासून पारदर्शकता ठेवली, तर गैरसमज टाळता येतात. ठराविक एकमेपलीकडची खरेदी करण्यापूर्वी एकमेकांची परवानगी घेण्याचा नियम ठरवा. यामुळे पारदर्शकता आणि समजूत वाढते.

२. **एकत्र उद्दिष्ट ठरवा :** घर घेणं, प्रवास, किंवा आकस्मिक खर्चांसाठी फंड बनवणं यांसारख्या गोष्टींसाठी एकत्र बचत करायची दिशा ठरवा. एकत्र उद्दिष्ट असले, की दोघांचं लक्ष

केंद्रित राहते.

३. **संयुक्त बजेट तयार करा :** रोजचा खर्च किमान सहा महिने लिहून काढा. कॅश, क्रेडिट कार्ड, जी-पे, ऑनलाइन आदी सर्व खर्च त्याच दिवशी लिहा आणि क्रेडिट कार्डचे बिल देताना ते लिहिले जाणार नाही, याची दक्षता घ्या. दोघांचे उत्पन्न आणि खर्च लक्षात घेऊन बजेट बनवा. यामुळे कुठे किती खर्च होतोय आणि किती बचत होऊ शकते हे समजते.

४. **बँक खात्यांचे व्यवस्थापन ठरवा :** फक्त दोन खाती ठेवा. एक: पतीचे नाव पहिले आणि पत्नीचे दुसरे, दोन: पत्नीचे नाव पहिले आणि पतीचे दुसरे. नॉमिनेशन जरूर ठेवा जे तुम्हाला केव्हाही बदलता येते. शक्यतो सरकारी किंवा खासगी बँकेत खाते ठेवा. घराच्या जवळ आहे म्हणून चुकीच्या बँकेत खाते उघडल्याने आणि ती नंतर बँक बुडाल्यामुळे पश्चात्ताप झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

५. **इमर्जन्सी अर्थात आपत्कालीन फंड तयार करा :** किमान सहा महिन्यांच्या गरजेच्या खर्चाइतके पैसे बाजूला ठेवा. अचानक आजार, नोकरी जाणं किंवा इतर आकस्मिक प्रसंगात हे कामी येईल. कोविड हे एक ज्वलंत उदाहरण आहे. हे पैसे बँकेत न ठेवता चांगल्या म्युच्युअल फंडाच्या लिक्विड किंवा ओव्हरनाईट फंडात ठेवा, जे केव्हाही काढता येतात आणि या योजनांमधले पैसे शेअर बाजारात गुंतविले जात नाहीत.

६. **कर्ज आणि इन्शुरन्स :** जोडीदाराकडे कर्ज किंवा क्रेडिट कार्डचे देणे असेल, तर ते कसे फेडायचे याचे नियोजन करा. जास्त व्याज असलेले कर्ज आधी फेडा. गुंतवणुकीवर परतावा घेतलेल्या कर्जावरील व्याजापेक्षा कमी असेल, तर गुंतवणूक करण्यापेक्षा आधी कर्ज फेडा. इन्शुरन्स घ्या परंतु, तो तुम्हाला गरज असेल तर. बँकेतील आणि इतर एजंटची टार्गेट पूर्ण करण्यासाठी इन्शुरन्स आणि इतर तत्सम योजना घ्यायला त्यांना साफ नकार द्या. मग ते नातेवाईक असले, तरीही नकार द्या.

७. **महत्त्वाची कागदपत्रे अपडेट करा :** विमा, निवृत्ती निधी आणि इतर कायदेशीर कागदपत्रांवर जोडीदाराचे नाव लाभार्थी म्हणून घालणे विसरू नका. आजही माझ्या अनेक गुंतवणूकदारांच्या सुनांची पासपोर्टवरील नावे जुनी म्हणजे लग्नाआधीचीच असतात, ज्याने अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात.

८. **आर्थिक नियोजनाचा नियमित आढावा घ्या :** दर तीन किंवा सहा महिन्यांनी एकदा दोघांनी एकत्र बसून बजेट, खर्च उत्पन्न आणि उद्दिष्टांमध्ये झालेल्या बदलांवर चर्चा करा.

९. **तज्ज्ञांचा सल्ला घ्या :** फायनान्स हा तुमचा विषय नसेल किंवा तुम्हाला आर्थिक नियोजन किंवा गुंतवणुकीसाठी वेळ देता येत नसेल, तर तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या. तब्येत बिघडली, तर आपण डॉक्टरांचा सल्ला घेतो; तसेच गुंतवणुकीसाठीसुद्धा अनुभवी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

१०. **इच्छापत्र करा :** लग्नानंतर किंवा मुले झाल्यावर, इच्छापत्र जरूर करा ज्यामुळे अनेक प्रश्न सुटतील.

यशस्वी वैवाहिक जीवनासाठी फक्त प्रेमच नव्हे, तर चांगली आर्थिक समजूत आणि शिस्तही तितकीच महत्त्वाची आहे!

**(लेखक एव्हएस सोल्युशन्सचे प्रवर्तक आहेत.**

९८२३६६६९१३

## आकडे बोलतात...

